कामगार उप आयुक्त, या पदावर पदोन्नती व पदस्थापना देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कामगार विभाग
शासन आदेश क्रमांक: पदोन्न-०४२६/प्र.क्र. ९३/कामगार-८
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३१ ऑगस्ट, २०२६

वाचा :

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही २०१८/प्र.क्र.१५९/कार्या-१२, दि.०१.०८.२०१९.

शासन आदेश:

कामगार आयुक्त यांच्या आस्थापनेवरील सहायक कामगार आयुक्त, गट-अ (वेतनश्रेणी एस-१८:४९१००-१५५८००) या संवर्गातून कामगार उप आयुक्त, गट-अ (वेतनश्रेणी एस-२३:६७७००-२०८७००) या संवर्गात ०५ अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत सन २०२५-२६ च्या निवडसूचीस सामान्य प्रशासन विभागाने मान्यता दिलेली आहे. तथापि, श्री. प्र. ब. जाधव, सहायक कामगार आयुक्त यांनी दि.०७.०८.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कामगार उप आयुक्त, गट-अ पदावरील पदोन्नती नाकारली आहे. यास्तव, श्री. जाधव यांचे नाव सदर निवडसूचीमधून वगळण्यात आले असून, उर्वरित खालील अधिकाऱ्यांना सहायक कामगार आयुक्त, गट-अ संवर्गातून कामगार उप आयुक्त, गट-अ या संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे. सदर अधिकाऱ्यांना पदोन्नतीनंतर खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे पदस्थापना देण्यात येत आहे.

अ.क्र	ज्ये. क्र.	अधिकाऱ्यांचे नाव, पदनाम	मूळ प्रवर्ग	पदोन्नतीचा प्रवर्ग	पदोन्नतीनंतरची पदस्थापना / कार्यालय
१	०८	श्री. चे. बा. जगताप, सहायक कामगार आयुक्त	खुला	खुला	कामगार उप आयुक्त, ग्रामीण विभाग, कामगार आयुक्तालय, मुंबई.
२	१०	श्री. ग. स. शिंदे, सहायक कामगार आयुक्त	खुला	खुला	अध्यक्ष, माल वाहतुक माथाडी मंडळ, मुंबई.
३	११	श्री. वि. वि. घोडके, सहायक कामगार आयुक्त	इ.मा.व. (वैध)	खुला	कामगार उप आयुक्त, अमरावती.
४	१२	श्री. अ. ऊ. कुटे, सहायक कामगार आयुक्त	भ.ज./ड	खुला	अध्यक्ष, किराणा बाजार माथाडी मंडळ, मुंबई.

२. मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधीन राहून सदर संवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार आणि सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तात्पुरत्या पदोन्नतीस मान्यता देण्यात येत आहे.

३. उपरोक्त तक्त्यात नमूद पदोन्नत अधिकाऱ्यांना त्यांच्या पदोन्नतीनंतरच्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी याद्वारे कार्यमुक्त करण्यात येत असून, त्यांनी नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू व्हावे. याबाबतचा रुजू अहवाल संबंधित पदोन्नत अधिकाऱ्यांनी विहित मार्गाने शासनास सादर करावा.

४. श्री. प्र. ब. जाधव, सहायक कामगार आयुक्त यांनी दि.०७.०८.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कामगार उप आयुक्त, गट-अ पदावरील पदोन्नती नाकारली असल्याने त्यांचे प्रकरणी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१९.११.२०१६ मधील तरतूदीनुसार कामगार आयुक्त यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

५. सदर अधिकाऱ्यांनी पदोन्नती नाकारल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१२.०९.२०१६ च्या शासन निर्णयानुसार संबंधितावर कार्यवाही करण्यात येईल. तसेच, त्यांनी अनधिकृतपणे रजेवर जाऊ नये. तसेच पदस्थापना रद्द अथवा त्यात बदल करणेसाठी कोणत्याही स्वरुपाचे आवेदन सादर करु नये. तसे केल्यास सदर अधिकारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील २ (ड) मधील तरतुदीनूसार पदोन्नतीने नियुक्ती होणाऱ्या अधिकाऱ्यांनी सदर आदेश निघाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या विहित मुदतीमध्ये रुजू होणे आवश्यक आहे. विहित मुदतीत रुजू न झाल्यास संबंधित अधिकाऱ्याचा अनुपस्थितीचा कालावधी अकार्यदिन (dias non) म्हणून गणला जाईल, याची देखील संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०८३११३०६२७२६५४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=3389518A88AF500EF17FD52858804C56D5B0DB93CE68C9638764849614F0C8B3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2026.08.31 13:07:20 +05'30'

(स्वप्निल कापडणीस)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. कामगार आयुक्त, कामगार भवन, वांद्रे- कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
५. सह आयुक्त कामगार (माथाडी), कामगार भवन, वांद्रे- कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
६. अवर सचिव (कामगार-५), उद्योग, ऊर्जा , कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई
७. कामगार उप आयुक्त (प्रशासन),कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
८. महालेखापाल (लेखापरीक्षा व लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१०. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
११. संबंधित पदोन्नत अधिकारी (कामगार आयुक्त यांचेमार्फत)
१२. निवडनस्ती (कामगार-८)